नियमित दिवाणी मुकदमा क्र. ७२ सन २०१६
(श्री. सुधाकर साळगांवकर –वादी वि. भास्कर साळगांवकर –प्रतिवादी )
निशाणी ५६ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन असे की, सदर दाव्यातील पॅरा नं. ४ मधील शेवटच्या ओळीत प्रतिवादी नं. १ ते ७ ही ताराबाई उर्फ ताराभावीन यांच्यापासून निर्माण झालेली पिढी आहे असे नमुद आहे. प्रत्यक्षात सदरचे वारस हे बाळबाई उर्फ बाळगे भावीण हिचे आहेत. त्यामुळे दाव्यात तशी दुरुस्ती करणे गरजेचे आहे. तरी दाव्यातील पॅरा नं. ४ मध्ये ''ताराबाई उर्फ ताराभावीण '' यांचे जागी ''बाळभाई उर्फ बाळगे भावीण' अशी लिहिण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

३. प्रतिवादीने सदर अर्जावरच म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार आहे. वादी याने यापूर्वीच सदरची दुरुस्ती करणे आवश्यक होते. अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक नाही. दाव्याची चौकशी सुरु झालेली आहे. त्यामुळे वादीला आता दुरुस्ती करता येणार नाही. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आली आहे.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दोन्ही पक्षामधील खराखुरा वाद अंतिमतः निर्णित करण्यासाठी न्यायालयास, प्रदान केलेल्या विवेकाधिकारानुसार कोणत्याही वेळी आणि त्यास योग्य वाटेल अशा दावा खर्चविषयक अटीवर किंवा अन्यथा, दाव्यातील कोणत्याही कार्यवाहीमधील कोणताही दोष किंवा चुक सुधारता येईल. तसेच प्रस्तावित दुरुस्ती विरुध्द पक्षास त्रासदायक होणार नाही याची दक्षता न्यायालयाने घेणे आवश्यक असते. थोडक्यात दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल न करणारी व खराखुरा वाद निर्णित करण्यासाठी आवश्यक असलेल्या दुरुस्तीस परवानगी देणे न्यायसंगत होते.

५. वादीने सदरचा दावा, दावा मिळकतींचे धडेवाटप होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांनी सरतपासाचे ॲफिडेव्हीट दाखल केलेले असून दावा वादीच्या उलटतपासासाठी प्रलंबित आहे. दावा वाटपासाठी दाखल केला असल्यामुळे त्यामध्ये पक्षकारांची योग्य नांवे दाखल असणे आवश्यक आहे.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने त्याचे सरतपासाचे अफिडेव्हीट दिनांक १०/१०/२०१९ रोजी दाखल केलेले आहे. वादीचा उलटतपास अद्याप सुरु झालेला नाही. प्रतिवादीला वादीचा उलटतपास घेण्याची संधी आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीवर कोणताही अन्याय होणार नाही. परंतु वादीने सदरचा अर्ज विलंबाने दाखल केला असल्यामुळे त्याच्यावर उचित खर्च आकारुन अर्ज मंजुर करणे न्यायसंगत होणार आहे या निष्कर्षापर्यंत मी पोहोचले आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीने प्रतिवादीला रक्कम रुपये २००/– (रुपये दोनशे मात्र) इतका खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीला असे आदेशीत करण्यात येते की, त्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १८ मध्ये दिलेल्या तरतुदीस अधीन राहून दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करावी.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2022.06.27 13:10:59 +0530

दिनांक :– २३/०६/२०२२

(अ. जो. बाचुळकर),
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कुडाळ.